IO ५ग

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** बीड **P.S.(ठाणे):** गेवराई **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0058 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/02/2019 19:00 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 27/02/2019

**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 27/02/2019

**Time From (वेळेपासून):** 12:55 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 27/02/2019 **Time (वेळ):** 18:32 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 032 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/02/2019 18:32 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 0.5 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती कार्यालयाचे बाहेर,गेवराई

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** धनेश्वर प्रकाश खेत्रे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

(c) **Date/Year of Birth (जन्म** 1992 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.**(अ. क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सुलतानपूर, ,गेवराई,गेवराई,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सुलतानपूर, ,गेवराई,गेवराई,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.): 91-9707090909

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक विनायक भास्करराव येळंबकर | | | 1. समर्थ शिक्षक कलनी,गेवराई,गेवराई,बीड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू.मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ. क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम सूचना तथ्य ):

फिर्याद  दिनांक 27/02/2019.पोलीस उप अधीक्षक कार्यालय,लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, बीड,कँप गेवराई, जि.बीड.मी धनेश्वर प्रकाश खेत्रे, वय-27 वर्षे, धंदा-नोकरी, बस वाहक, माजलगाव आगार, रा.सुलतानपूर, ता.गेवराई, जि.बीड, मो.9707090909.मी दि. 26/02/2019 राजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, बीड येथे जाऊन श्री.हनपुडे पाटील, पोलीस उप अधीक्षक यांना भेटून माझी एका लोकसेकाविरूध्द माझे कामासाठी लाच मागत असेलबाबत तक्रार असल्याचे सांगितले होते. त्यांनतर हनपुडे पाटील साहेबांनी मला पोलीस निरीक्षक श्री.गजानन वाघ यांचेकडे  माझा तक्रारी अर्ज देण्यास सांगितला असता मी पोलीस निरीक्षक गजानन वाघ यांना माझा तक्रारी अर्ज दिला व माझ्या तक्रारी अर्जानुसार कायदेशीर कारवाई करणेबाबत विनंती केली.त्यानंतर पोनि.वाघ यांनी माझा तक्रारी अर्ज घेतला. माझ्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने पोनि.वाघ यांनी कार्यालयात हजर असलेले दोन शासकिय कर्मचारी यांची ओळख श्री.माणिक रामभाऊ पुरी, धंदा-नोकरी, शिपाई, नगर परिषद, बीड व श्री.हिरामन भिमरा पवार, वय-55 वर्षे, धंदा-नोकरी, मलेरिया विभाग प्रमुख नगर पिरषद, बीड असा करून दिला व ते सर्व सापळा कारवाई दरम्यान पंच म्हणून काम करणार असल्याचे सांगितले.त्यानंतर पोनि.वाघ यांनी माझी तक्रार दोन्ही पंचांना तोंडी सांगण्यास सांगितली असता दोन्ही पंचांना माझी तक्रार मी सांगितली. की, मी सुलतानपूर, ता.गेवराई, जि.बीड येथील रहीवाशी असून माझी पत्नी सौ.अश्विनी धनेश्वर खेत्रे या भेंड खुर्द व सुलतापूर ग्रुप ग्रामपंचायतच्या सदस्य आहेत. सुलतानपूर येथील भाग-1 मधील गट क्र.02 ते 35 व भाग-2 मधील गट क्र.36 ते 56 मधील एकूण 40 शेतकऱ्यांचे शेतातील बांद बंदिस्तचे काम करण्यासाठी ग्रामपंचायतीचा दि.26/01/2019 रोजी ठराव घेऊन फाईल तयार केल्या आहेत. त्या फाईलवर मी APO (कार्यक्रम अधिकारी) तसेच कृषी अधिकारी पंचायत समिती गेवराई यांची टिपणी टाकून सह्या घेतलेल्या आहेत. सदर फाईलवर श्री.येळंबकर, विस्तार अधिकारी, पंचायत समिती गेवराई यांची टिपणी व सहीची आवश्यकता आहे. फाईलवर टिपणी टाकून सही घेण्यासाठी मी श्री.येळंबकर साहेबांना भेटलो असता त्यांनी मला फाईलवर टिपणी टाकून सही करण्यासाठी 4000/-रू ची मागणी केली आहे. त्यांना मला पैसे देण्याची ईच्छा नाही. तरी माझ्या तक्रारी अर्जानुसार श्री.येळंबकर, विस्तार अधिकारी, पंचायत समिती गेवराई यांचेवर कायदेशर कारवाई करावी. त्यानंतर पोनि.वाघ यांनी माझा तक्रारी अर्ज दोन्ही पंचांना वाचण्यास दिला सदरचा अर्ज दोन्ही पंचांनी वाचला मी सांगितलेली तोंडी तक्रार व माझा तक्रारी अर्ज सारखाच असल्याची खात्री केली. सदर अर्जावर पोनि.वाघ दोन्ही पंचानी सह्या केल्या.माझ्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने पोनि.वाघ यांनी  नगर परिषद, बीड येथील शासकिय पंच 1) श्री.माणिक रामभाऊ पुरी, वय-55 वर्षे, धंदा-नोकरी, शिपाई, नगर परिषद, बीड वर्ग-4 यांची पंच क्र.1 तर श्री.हिरामन भिमराव पवार, वय-55 वर्षे, धंदा-नोकरी, मलेरिया विभाग प्रमुख नगर पिरषद, बीड वर्ग-3 यांची पंच क्र.2 म्हणून निवड केली. त्यानंतर मी पोनि.वाघ यांना सांगितले की, येळंबकर साहेबांनी फोनवर सिरसदेवी, ता.गेवराई येथे भेटण्यासाठी बोलावले आहे.त्यानुसार पोनि.वाघ यांनी मला व सापळा पथकास शासकिय वाहनाने शिरसदेवी कडे रवाना झालोत. शिरसदेवी येथे सुरक्षीत ठिकाणी पोहचल्यानंतर पोनि.वाघ यांनी मी दिलेल्या तक्रारी अर्जानुसार माझ्या कामासाठी

विस्तार अधिकारी श्री.येळंबकर हे लाचेची मागणी करतात किंवा कसे या बाबत पडताळणी करणेचे ठरविले. त्यानुसार मला व पंच क्र.1 श्री.पुरी यांना पोनि.वाघ यांनी योग्य त्या सुचना देऊन लोकसवेक येळंबकर यांची भेट घेणेसाठी मी सिरसदेवी येथे उपलब्ध केलेल्या मोटारसायकलवर पंचासह रवाना करून पंचासामक्ष लाचमागणी पडताळणी केली असता लाच मागणी पडताळणी दरम्यान लोकसेवक येळंबकर यांनी माझ्या फाईलवर टिपणी टाकून सही करण्यासाठी 4,000/-रू मागणी करून तडजोड अंती 3,000/-रू तात्काळ देण्यास संगितले. त्यावर मी त्यांना माझ्याकडे आत्ता पैसे नाहीत थोड्या वेळाने शिरसदेवी येथे देतो असे सागितले. त्यांनतर आम्ही सुरक्षीत ठिकाणी परत येऊन पंच क्र.1 व मी सर्व हकीगत पोनि.वाघ यांना पंच क्र.2 यांचे समक्ष सांगितली. पोनि.वाघ यांनी लाचामणी पडताळीची खात्री करून लागलीच सापळा आजमावण्याचे ठरवले. त्यानुसार सिरसदेवी येथे सापळा पूर्व कारवाईचा पंचनामा करून मला व सापळा पथकास योग्य त्या सुचना देऊन सिरसदेवी येथे लाचेच्या सापळ्याचे आयोजन करण्यात आले.त्यांनतर सिरसदेवी येथी येळंबकर यांची येण्याची वाट पाहिली परंतू ते न आल्याने मी त्यांना फोन करून बोललो असता त्यांनी मला ते गेवराईकडे गेले असल्याचे सांगून फाईली पंचायत समिती गेवराई येथील कदम यांचेकडे देण्यास संगितल्याने व त्यांची दि.26/02/2019 रोजी भेट होणार नसल्याने पोनि.वाघ यांनी सापळा कारवाई स्थगित करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर दि.26/02/2019 रोजी करण्यात आलेल्या सपंूर्ण कारवाईचा लाचमाणी पडताळणी, सापळा पूर्व व सापळा कारवाई स्थगितीचा पंचनामा केला. पोनि.वाघ यांनी मला व पंचांना सुचना दिल्या की, दि.27/02/2019 रोजी पंचायत समिती कार्यालय, गेवराई येथे लाचेच्या सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असल्याने झालेल्या सापळा कारवाईबाबत गोपनियता राखणेबात सुचना देऊन दि.27/02/2019 रोजी 09:30 वा. लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, बीड येथे येण्याचे सांगितले.दि.27/02/2019 रोजी मी लाचलुचपत प्रतिबधक कार्यालय, बीड येथे हजर आलो. सर्व सापळा पथक बीड येथून शासकिय वाहनाने रवाना होऊन गेवराई येथे सुरक्षीत ठिकाणी पोहचलोत. पोनि.वाघ यांनी मला व सापळा पथकातील सर्व सदस्यांना योग्य त्या सुचना देऊन पंचायत समिती गेवराई येथे लाचेच्या सापळ्याचे आयोजन केले. मी व पंच क्र. 1 असे पंचायत समिती गेवराई येथे जाऊन विस्तार अधिकारी श्री.येळंबकर यांची भेट घेतली असता येळंबकर साहेबांनी माझ्याकडील फाईलवर सह्या करून माझ्याकडून इशाऱ्याने पैशाची मागणी करून पंचायत समिती कार्यालयोच बाहेर चहाचे हटेलवर 3,000/-रू स्विकारल्या नंतर मी नेमून दिलेला इशारा सापळा पथकास केला असता 12:55 वा. येळंबकर विस्तार अधिकारी, पंचायत समिती गेवराई यांना रंगेहाथ पकडून त्यांचे ताब्यातून अँथ्रसीन पावडरयुक्त लाचेच्या 500/-रू दराच्या सहा नोटा असे एकूण 3,000/-रू, एक पांढऱ्या रंगाचे पाकीट (इनव्हलप) व माझ्या कामासंबंधीच्या दोन्ही फाईल ताब्यात घेतल्या आहेत.आरोपी लोकसेवक विनायक भास्करराव येळंबकर, वय-47 वर्षे, धंदा-नोकरी, विस्तार अधिकारी पंचायत समिती, गेवराई, वर्ग-3, रा. समर्थ शिक्षक कलनी, गेवराई जि.बीड यांनी सुलतानपूर येथील बांद बंदिस्त कामाचे फाईलवर टिपणी टाकून सही करण्यासाठी दि.26/02/2019 राजी 4,000/-रू लाचेची मागणी करून तडजोड अंती 3,000/-रू स्विकारण्याचे मान्य करून दि.27/02/2019 रोजी पंचायत समिती कार्यालय गेवराईचे समोरील चहाचे हटेलवर 3,000/-रू लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडले आहे. तरी आरोपी लोकसेवक विनायक भास्करराव येळंबकर, वय-47 वर्षे, धंदा-नोकरी, विस्तार अधिकारी पंचायत समिती, गेवराई, वर्ग-3, रा.समर्थ शिक्षक कलनी, गेवराई जि.बीड यांनी त्यांचे पदाचा गैरवापर केल्याने त्यांचेविरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**

**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):** RAJARAM KASHINATH TADVI(SI (Sub-Inspector)) / POBN79498 **or**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे **Rank (**पद**):**

**No.(**क्र.**):** **to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

पो.स्टे.गेवराई

**Name** (नाम): RAJARAM KASHINATH TADVI

**Rank**(पद): SI (Sub-Inspector)

**No.**(सं.): POBN79498